**जनसंपर्क अधिकारी**

**पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव**

फोन ०२५७-२२२१७९० फॅक्स ०२५७-२२२०५११

Email ID:-sp.jalgaon@mahapolice.gov.in


## -:प्रेस नोट :-

दिनांक :- १०/०५/२०२६

# " जळगांव पोलीसांची धडक कारवाई: टॉवर चौकातील लॉजवर छापा टाकून वेश्याव्यवसायाचा पर्दाफाश "

===०००===

**दिनांक 09/05/2026 रोजी श्री. राहुल गायकवाड, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, जळगाव यांना** गुप्त बातमीदाराकडून विश्वसनीय माहिती मिळाली की, टॉवर चौक परिसरातील एका नामांकित लॉजवर काही महिलांना पैशांचे आमिष दाखवून त्यांच्याकडून बेकायदेशीररीत्या वेश्याव्यवसाय करवून घेतला जात आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता **मा. श्री. श्रीकांत धिवरे, पोलीस अधीक्षक, जळगांव** यांनी तात्काळ **श्री. राहुल गायकवाड, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, जळगाव यांचे नेतृत्वाखाली** स्थानिक गुन्हे शाखा (LCB) आणि अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने (AHTU) च्या अधिकाऱ्यांना कारवाई करण्याबाबत आदेशीत केले.

स्थानिक गुन्हे शाखा (LCB) आणि अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने (AHTU) च्या पथकाने मिळालेल्या माहितीची पडताळणी करत अत्यंत शिताफीने या कारवाईचे नियोजन केले. **एका बनावट (डमी) ग्राहकाला** संबंधित लॉजवर पाठवण्यात आले. डमी ग्राहकाने पैशांची बोलणी करून पोलिसांना ठरलेला इशारा दिला. इशारा मिळताच दबा धरून बसलेल्या पोलीस पथकाने लॉजवर अचानक छापा कारवाई करत संबधीत लॉजवर वेश्याव्यवसाय सुरू असल्याचे निष्पन्न झाले.

पथकांकडुन सदर बाबत PITA Act कलम ३, ४, ५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन, वेश्याव्यवसाय चालवणाऱ्या **आरोपीत नामे राजू मोतीराम जोशी याला अटक करण्यात आली तसेच सदर ठिकाणाहून रोख रक्कम व साहित्य जप्त करण्यात आलेले आहे.** या सेक्स रॅकेटची पाळेमुळे कुठपर्यंत पसरली आहेत आणि यात आणखी कोणा-कोणाचा सहभाग आहे, याबाबतचा पुढील सखोल तपास पोलीस करत आहेत.

तसेच, या रॅकेटमध्ये अडकलेल्या पीडित महिलांची पोलिसांकडून सुटका करण्यात आली असून, त्यांचे समुपदेशन करून त्यांना सुधारगृहात पाठवण्याची प्रक्रिया सुरू आहे.

**शहरात कुठेही असे गैरप्रकार आढळल्यास नागरिकांनी निर्भयपणे पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन मा. श्री. श्रीकांत धिवरे, पोलीस अधीक्षक, जळगांव यांचे कडुन नागरिकांना करण्यात आलेले आहे.**

**सदरची कामगिरी मा. श्री. श्रीकांत धिवरे, पोलीस अधिक्षक, जळगाव, श्री. संदीप गावीत, अपर पोलीस अधीक्षक,जळगाव परिमंडळ, श्री. नितीन गणापुरे, उप विभागीय पोलीस अधिकारी, जळगाव विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. राहुल गायकवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, जळगाव यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखा (LCB) आणि अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने (AHTU) येथील अधिकारी/अमंलदार यांचे पथकाने कौशयल्यपुर्ण उल्लेखनिय कामगिरी केलेली आहे.**

**जनसंपर्क अधिकारी,**

**पोलीस अधिक्षक कार्यालय, जळगांव**

**************************************************************************************************************